महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**-: आदेश :-**

क्र.पोमसं/२/१०२०/नि.नि.सू.-२०२४-२०२५/१५४/२०२४ दिनांक :- २७/०६/२०२५

संदर्भ :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-०२२५/प्र. क्र. ४४/भाग-२/पोल-१ अ, दि. २७/०६/२०२५ (प्रत संलग्न)

विषय :- **नियमित निवडसुची, २०२४-२५**
"सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल" या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.

* * * * *

"सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल" या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र सशस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सन २०२४-२०२५ च्या निवडसूचीवरील ०१ अधिकाऱ्याचे पदोन्नतीवरील पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. उपरोक्त शासन आदेशांत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी.

आ. पदोन्नती प्राप्त पोलीस निरीक्षकांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटक प्रमुखांनी पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे.

इ. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती

समितीच्या बैठकिनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

१) शिक्षा प्रस्तावित / चालू झाली असल्यास

२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

३) दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

४) निलंबित असल्यास, इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

ई. ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही मा.न्यायालयाचे, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा मा.न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही याबाबतही दक्षता घेण्यात यावी. अशी प्रकरणे उद्भवल्यास त्यांचा सविस्तर अहवाल या कार्यालयाला पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

उ निवडणूकीची आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

ऊ वरील बाबी लक्षात घेऊन घटक प्रमुखांनी पदोन्नत पोलीस निरीक्षकांना त्यांच्या नावासमोरील नमुद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.

मा. पोलीस महासंचालकांनी उपरोक्त पदोन्नत अधिकारी यांना पदोन्नतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

( सुप्रिया पाटील - यादव )
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.३, जालना

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२
(लक्षवेध :- संदीप ढाकणे, अवर सचिव, पोल १अ)

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

प्रत :-

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (सस्नेह)
संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३ -अ, ९, ११, ३६, ४०
संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

नियमित निवडसूची, २०२४-२५:

*"सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल" या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.*

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन आदेश क्र.रापोसे-०२२५/प्र.क्र.४४/भाग-२/पोल-१अ.

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.

दिनांक : २७ जून २०२५.

<u>संदर्भ</u> :-
१) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.
२) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/२/नि.सू.-२४-२५/ सहा.समा./११५/२०२४, दि.०८.०५.२०२५, ११.०६.२०२५
४) शासन पत्र, गृह विभाग, क्र.रापोसे-०२२५/प्र.क्र.४४/पोल-१अ, दिनांक ३०.०५.२०२५, २६.०६.२०२५.

<u>शासन आदेश</u>.

"सशस्त्र पोलीस निरीक्षक" या संवर्गातील पदावरुन "सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहा. समादेशक, रा.रा. पोलीस बल" या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या "सशस्त्र पोलीस निरीक्षक" या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियमित निवडसूची सन २०२४-२५ यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद पोलीस अधिका-यास "सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहा. समादेशक, रा.रा. पोलीस बल" या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत असून, त्यांची स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे-

| अ.क्र. (१) | नाव (२) | पदोन्नतीने पदस्थापना (३) |
|---|---|---|
| १. | प्रकाश व्यंकटराव बडुरे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.३, जालना. |

<u>अटी</u>:-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

४) उक्त निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याच्या अधीन तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/ न्यायालय यांचे आदेश, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

३. हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने *[अनौपचारिक संदर्भ क्र.-/२०२५/का.-१२ (सेवा-३), दिनांक २५/०६/२०२५]* आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न मधील तरतुदींनुसार सर्वोच्च सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६२७१८५३१२८०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MRUNAL KRISHNA SAWANT

Digitally signed by MRUNAL KRISHNA SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=0cb0d6ece0ccae8c84500c20573f214867456b72833559abe295a3addc1547c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=410C5F7970E99BA8F8E7899E41A3E5C504381ED982CD86DE7B0B97C6881E3432, cn=MRUNAL KRISHNA SAWANT
Date: 2025.06.27 18:54:00 +05'30'

**(मृणाल कृष्णा सावंत)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,**
**गृह विभाग.**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) अपर पोलीस महासंचालक, रा.रा. पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस उप महानिरीक्षक, रा.रा. पोलीस बल, छत्रपती संभाजीनगर.
३) समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.३, जालना.
४) संबंधित सहायक समादेशक, रा.रा. पोलीस बल *[अपर पोलीस महासंचालक, रा.रा. पोलीस बल, यांच्यामार्फत].*
५) संबंधित पोलीस अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
६) निवड फाईल, पोल-१अ.

**प्रत-**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/ लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२) जिल्हा कोषागार अधिकारी जालना.